# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग जि. रायगड पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, ईमेल dycfalibag@mahaforesg.gov.in

---

पत्र

विषयः- वनजमीन रायगड.
मौजे आपटे, ता. पनवेल येथील अंतिम संपादीत व खाजगी वनक्षेत्रातील बांधकामे नियमीत करणेसाठी वनक्षेत्र मागणी प्रस्ताव क्षेत्र 0.4867 हे. मे. अंजनी फार्म, आपटे.

जा.क्र. ब/20/जमीन/ 5614 /2015-16.
अलिबाग 402 201. दिनांकः- 16 /03/2016.

प्रति,

श्री. राम मनसुखानी,
मे. अंजनी फार्म,
मु.पो. तारा गांव, ता. पनवेल,
जि. रायगड.

संदर्भः- 1) आपलेकडील दिनांक 24/09/2014 रोजीचे पत्र.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/2850, दिनांक 28/10/2014.
3) आपलेकडील दिनांक 3/02/2016 रोजीचे पत्र.

आपण वरील संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये मौजे आपटे, ता. पनवेल येथील अंतिम संपादीत व खाजगी वनक्षेत्रातील बांधकामे नियमीत करणेसाठी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत वनक्षेत्र 0.4867 हे. मागणी प्रस्ताव दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे पुर्तता होणे आवश्यक आहे.

1) इंडेक्स मॅपः- वनेत्तर प्रयोजनासाठी मागणी केलेले वनक्षेत्र सुचीनिहाय नकाशावर दर्शविलेले नाही.

2) इको सेन्सेटिव्ह मॅपः- अ) सदर नकाशा कोणते प्रयोजनासाठी जोडणेत आलेला आहे याचा अर्थबोध होत नाही.

ब) नकाशामध्ये कर्नाळा पक्षी अभयारण्यापासून प्रस्तावीत क्षेत्राचे अंतर 1 कि.मी. असल्याचे नमूद आहे. तथापी प्रस्तावीत क्षेत्र कर्नाळा पक्षी अभयारण्याचे सिमेस असल्याचे दर्शविले आहे.

क) वनेत्तर कामाकरीता मागणी केलेले क्षेत्राचे अक्षांश/रेखांश एकत्रित दर्शविले आहे. ते प्रस्तावीत क्षेत्राचे ठिकाणी अचुक दर्शविणे आवश्यक आहे.

ड) सदर नकाशा केंद्रशासनाचे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे नाही.

3) गाव नकाशा आपटेः- अ) क्षेत्रविवरण तक्त्यांत नमूद केलेले वनेत्तर कामांचे लांबी रुंदी अचुक

दर्शवून त्याअंतर्गत बाधीत क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.

ब) नकाशा योग्यप्रमाणांत, जिओ डिजीटल, जिओ रेफरन्ससह असणे आवश्यक आहे.

क) क्षेत्र विवरण तक्त्यांत नमूद करण्यांत आलेल्या वनेत्तर कामांच्या बाबी नकाशांत योग्यरित्या दर्शविणेत आलेल्या नाहीत.

ड) नकाशामध्ये मागणी केलेल्या वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्राचे सर्व्हे क्रमांकाचे हद्दी सुस्पष्ट दिसून येत नाहीत.

ई) वनेत्तर क्षेत्रासाठी मागणी करणेत आलेल्या क्षेत्राचे अक्षांश/रेखांश नकाशामध्ये दर्शविणेत आलेले नाही.

फ) नकाशावर प्राधिकृत अधिका-याची स्वाक्षरी नाही.

ग) नकाशामध्ये स.क्र. 25 चा वैधानिक दर्जा नमूद करण्यांत आलेला नाही.

4) प्रस्तावातील समाविष्ठ असणारे सर्व गावांचे गाव नकाशे विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार प्रस्तावांत समाविष्ठ असणे आवश्यक आहे.

5) प्रस्तावातील क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये मौजे आपटे ता. पनवेल येथील स.क्र. 26 चे क्षेत्र समाविष्ठ करण्यांत आलेला नाही, तथापी प्रस्तावामध्ये समाविष्ठ जुना स्थळ तपासणी अहवाल, नकाशा यांमध्ये स.क्र. 26 चा समावेश असल्याचे दिसून येत आहे. तसेच त्याप्रमाणे पूर्तता करणे आवश्यक आहे.

सोबत प्रस्तावाचे 6 संच परत करण्यांत येत आहेत.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

\\Land3\land 3\2014-15\F.C.ACT\Anjani Farm\Anjani Farms.doc